PARLE MAHOTSAV

Organiser - ADV. PARAG ALAVANI, MLA, President - Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com

PARLE MAHOTSAV

**कृपया प्रसिद्धीसाठी**

# पार्ले महोत्सवमुळे पार्लेला मिळाली क्रीडानगरी म्हणून ओळख- प्राचार्य श्री. मिलिंद जोशी

मुंबई, दि. २५ : पार्ले महोत्सवातील कला-क्रीडा वातावरणात पार्लेची ओळख शिक्षण व सांस्कृतिक नगरीसोबतच क्रीडानगरी म्हणूनही निर्माण होऊ लागली असल्याचे प्रतिपादन साठे महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. मिलिंद जोशी यांनी केले. पार्लेमहोत्सवातील बुद्दीबळ व कॅरम स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अधिकाधिक लोकांनी महोत्सवात भाग घ्यावा म्हणजे नवनवीन कलावंत व क्रीडापटू घडतील असेही ते म्हणाले. राष्ट्रीय बुध्दीबळपट्टु श्री. अविनाश आवटे यांच्या हस्ते बुद्दीबळ व कॅरम स्पर्धेचे उद्घाटन झाले. बुद्दीबळ खेळामुळे विद्यार्थ्यांची अभ्यासातही प्रगती होते. आयुष्याकडे पाहण्याचा पॉझीटीव्ह दृष्टीकोन वाढीस लागतो. खेळाडु मानसिकरित्या बळकट होतो, असे आवटे यांनी बुध्दीबळाचे फायदे उपस्थितांना सांगितले.

१८ व्या पार्ले महोत्सवातील विविध क्रीडा स्पर्धांना मुंबईकरांनी प्रचंड प्रतिसाद दिला असून पहिल्या तीन दिवसांत १० स्पर्धांमधून आतापर्यंत सुमारे १५ हजार स्पर्धकांनी भाग घेतला. तिसऱ्या दिवशी बुद्धिबळ, कॅरम, क्रिकेट, टेनिस, खो-खो व पिकल बॉल या स्पर्धा सुरू झाल्या असून सर्व स्पर्धांमधून स्पर्धक संख्येचा उच्चांक गाठला आहे अशी माहिती प्रमुख आयोजक भाजपा आमदार पराग अळवणी यांनी दिली.

तिसऱ्या दिवशी सकाळी ६.०० वाजता चार वर्षांपासून ७८ वर्षीय ज्येष्ठ नागरिकांनी विलेपार्लेतील रस्त्यांवर आयोजित मॅरेथॉन शर्यतीत भाग घेतला. हजारंहुन अधिक स्पर्धाकांनी भाग घेतला. मॅरेथॉन पुरुष खुल्या गटात एस. चौहान तर महिला खुल्या गटात वोमीगा आर कोळी यांनी प्रथम क्रमांक पटकवला. तर साठे महाविद्यालयात आयोजित बुद्धिबळ व कॅरम स्पर्धांमधूनही शेकडो स्पर्धकांनी भाग घेतला.टेनिसमध्ये १५० खेळाडूंनी सहभाग घेतला. यावेळी राष्ट्रीय खेळाडू करण रस्तोगी यांनीही उपस्थित राहून खेळाडुंना प्रोत्साहन दिले. कबड्डीमध्ये महिला व पुरूषांच्या ५०० हून अधिक संघांनी सहभाग घेतला. व्हॉलिबॉलमध्ये आत्तापर्यंत ७२ संघांनी सहभाग नोंदविला असून यात राष्ट्रीय पातळीवरील व्हॉलिबॉल खेळाडू अभिषेक कर्नाड आणि अमित शास्त्री यांनीही सहभाग घेतला. नॅशनल तसेच पार्ले (पश्चिम) येथील लायन्स म्युनिसिपल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समधील क्रिकेट, खो-खो, पिकल् बॉल स्पर्धांनाही प्रचंड प्रतिसाद मिळाला.